MHLA160000772009

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९</u>**
**<u>शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सन्माननीय उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद दुसऱ्या अपिलामध्ये या दाव्यातील पूर्वीचा न्यायनिर्णय व हुकूमनामा रद्द ठरवून प्रकरण पुर्नसंपरिक्षेकरिता पाठविलेले आहे आणि मे महिन्याच्या शेवटपर्यंत निकाली काढण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर प्रकरण युक्तिवादाकरिता ठेवलेले आहे. परंतु आजरोजी कामाचा शेवटचा दिवस आहे आणि दि.११/०५/२०२६ पासून उन्हाळी सुट्ट्या आहेत. वादीचे अधिवक्ता श्री. बोडके यांनी पुरसीस नि.१५४ सादर केली आणि प्रकरण उन्हाळी सुट्ट्यामध्ये ठेवण्याची विनंती केली. प्रतिवादी आणि त्यांचे अधिवक्ता हजर नाहीत. परंतु त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची माहिती आहे. त्याप्रमाणे सदर प्रकरण उन्हाळी सुट्ट्यामध्ये ठेवणे योग्य होईल आणि त्या आधारे मुदतीत प्रकरण निकाली काढता येईल. सबब सदर प्रकरण उन्हाळी सुट्ट्यांमध्ये ठेवण्यात येते. संबंधितांनी नोंद घ्यावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.05.08 16:53:17 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – ०८–०५–२०२६**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**